जा.क्र उमाशि-२/अति.समा./पुवि/२०१३/३१६९.९/६४
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे १ यांचे कार्यालय
दिनांक : 2 DEC 2013

प्रति,

प्राचार्य / प्राचार्या,
सर्व उच्च माध्यमिक विद्यालय/ कनिष्ठ महाविद्यालय,
जिल्हा - पुणे / सोलापूर / अहमदनगर

विषय :- अतिरिक्त शिक्षक समावेशन.

शैक्षणिक २०१३-१४ मध्ये कार्यभार निश्चिती पटपडताळणी शिबीर माहे ऑगस्ट २०१३ ते ऑक्टोंबर २०१३ मध्ये आयोजित करण्यात आले होते. पुणे सोलापूर व अहमदनगर जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयांची पटपडताळणी झाली असून विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे तसेच तुकडया कमी झाल्यामुळे शिक्षक अतिरिक्त झालेले आहेत.

महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्रमांक २६ नुसार अनुदानीत कनिष्ठ महाविद्यालयातील अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकास प्रथमतः संस्थांतर्गत समावेशन करावे. सदरील अतिरिक्त शिक्षकाचे त्यांचे विषयाचे पद नसल्याने संस्थांतर्गत समावेशन होत नसल्यास त्यांचे इतर संस्थेमध्ये समावेशन करण्याबाबत प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्याबाबत कार्यभार निश्चिती पडताळणी आदेशाद्वारे सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार विहित प्रपत्रातील अतिरिक्त शिक्षक समावेशनाबाबतचा प्रस्ताव दिनांक १०/१२/२०१३ पूर्वी या कार्यालयास समक्ष श्री संदीप जाधव यांचेकडे सादर करावी. तसेच ईमेलद्वारे sandeep.jadhav70@gmail.com सादर करावी.

तसेच सर्व आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात २ मे २०१२ नंतर नियुक्त केलेल्या तसेच रिक्त असलेल्या विषय जागांची माहिती विहित प्रपत्रात दिलेल्या मूदतीतच दिनांक १०/१२/२०१३ पूर्वी सादर करावी. ज्या कनिष्ठ महाविद्यालयाची विहित प्रपत्रात दिलेल्या वेळेत या कार्यालयास प्राप्त न झाल्यास व होणा-या पुढील परिणांमास सर्वस्वी जबाबदार प्राचार्य राहतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

सोबत – प्रपत्रे

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १

प्रत - प्रत माहिती व कार्यवाहीसाठी रवाना
शिक्षणाधिकारी, / अधिक्षक, पुणे
वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, पुणे / सोलापूर / अहमदनगर

२/- वरील प्रमाणे आपल्या जिल्हयातील कनिष्ठ महाविद्यालयांची विहित प्रपत्रातील माहिती विहित केलेल्या दिनांकापूर्वी या कार्यालयास पोहोचेल याप्रमाणे योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

संस्था / कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव :- शाखा माध्यम

प्रपत्र क्रमांक १

## सन २०१३-१४ कार्यभार निश्चिती पडताळणी नुसार **अतिरिक्त** शिक्षकांची माहिती

| अ.क्रं. | सांकेतांक | कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव | शिक्षकाचे नांव | संवर्ग | ने. दिनांक | विषय | कार्यभार | कारण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

प्राचार्य स्वाक्षरी :-
प्राचार्य नांव :-
प्राचार्य मोबाईल क्रमांक :-

प्रपत्र क्रमांक २

## सन २०१३-१४ कार्यभार निश्चिती पडताळणी नुसार **रिक्त** जागांची माहिती

| अ.क्रं. | सांकेतांक | कनिष्ठ महाविद्यालयाचे नांव | विषय | कार्यभार | रिक्त होण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

प्राचार्य स्वाक्षरी :-
प्राचार्य नांव :-
प्राचार्य मोबाईल क्रमांक :-